महसूल व वन विभाग

पूर्वपृष्ठावरील टिप्पणीस अनुसरुन मा.अपर मुख्य सचिव (वने) यांचेशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सादर.

२. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षकांचे एका रिक्त पदावर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांना बैठकीसाठी दिनांक व वेळ मिळण्याची विनंती पूर्वपृष्ठावरील टिप्पणीन्वये करण्यात आली होती. मा.मुख्य सचिव यांच्या सूचनेनुसार सदर प्रकरणी मा.अपर मुख्य सचिव (वने) यांनी त्यांचेशी चर्चा केली आहे.

३. प्रस्तावित बैठकीत पृ.क.२१-२२/टि.वि वरील टिप्पणीस अनुसरुन श्री.प्र.ज.ठोसरे, भा.व.से.,संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे यांचे नावाचा विचार करणे प्रस्तावित होते. याबाबतीत मा.मुख्य सचिव यांनी असे सूचीत केले आहे की, श्री.प्र.ज.ठोसरे हे पूर्वी, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) पुणे या पदावर कार्यरत होते. पुणे जिल्ह्यातील वन जमिनींबाबत काही कालावधीपूर्वी वन संवर्धन अधिनियमाचे उल्लंघन व काही गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. यास अनुसरुन केंद्रीय सशक्तता समितीच्या शिफारशीनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकरणांची चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी समिती (SIT) पण गठीत केली आहे. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षकाच्या रिक्त असलेल्या पदासाठी श्री.प्र.ज.ठोसरे यांचे नांव पदोन्नतीसाठी विचारात घेण्यापूर्वी ते पुणे जिल्ह्यातील वन जमिनीसंदर्भात झालेल्या अनियमिततांमध्ये कोणत्याही प्रकारे गुंतलेले नाही असे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांचेकडून प्रमाणित करुन घ्यावे असे मा.मुख्य सचिव यांनी सुचीत केले आहे.

४. प्रसंगत: नमूद करण्यात येते की, पुणे जिल्ह्यातील जुन्नर वन विभागात एका वन संवर्धन अधिनियमाच्या उल्लंघन प्रकरणी तत्कालिन उपवनसंरक्षक, जुन्नर श्री.ए.एन.खडसे, भा.व.से. यांचेवर अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपिल) नियम १० अंतर्गत दोषारोपपत्र बजाविले आहे. याच प्रकरणी तत्कालिन मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे, श्री.प्र.ज.ठोसरे, भा.व.से व श्री.शिरीष अस्थाना, भा.व.से यांची भूमिकेबद्दल अभिप्राय देण्यासाठ प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना गोपनीय पत्र क्र.एफओ-१३०६/११५८/सीआर-१६० क-७, दिनांक १७.४.२०१० अन्वये विनंती केलेली आहे.

आदेशार्थ सादर.

(प्रदीप कुमार)
सह सचिव (वने)
२३.४.२०१०

अप्पर मुख्य सचिव (वने)

मा. मुख्य सचिव

23 APR 2010